बुधवार, २२ जानेवारी २०२५

२ पुण्य नगरी

## In Short

# विवेकानंद कॉलेजच्या समिधाची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड

**कोल्हापूर :** दिल्ली येथे दि. २६ व २७ जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित होणाऱ्या परेड व पंतप्रधान रॅलीसाठी विवेकानंद कॉलेजची एनसीसी छात्र सिनिअर अंडर ऑफिसर समिधा घुगरे (बी.कॉम. भाग २) हिची निवड झाली आहे. या परेडसाठी तिचा दिल्ली येथे दि. १ जानेवारीपासून सराव सुरू आहे.



निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

सकाळ
बुधवार, २२ जानेवारी २०२५




वसगडे (ता. करवीर) : येथे स्वामी विवेकानंद कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना कौस्तुभ गावडे. यावेळी उपस्थित मान्यवर.

# युवकांनी श्रमाच्या माध्यमातून संस्कार जपावेत : कौस्तुभ गावडे

## वसगडेत 'विवेकानंद'चे श्रमसंस्कार शिबिर

सांगवडेवाडी, ता. २१ : विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. युवकांनी श्रमाच्या माध्यमातून संस्कार जपावेत आणि शारीरिक श्रमाबरोबर आदर्शवादी समाजाची कौशल्य प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले.

वसगडे (ता. करवीर) येथे विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष संस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रत्येकी एक अशिक्षित व्यक्तीला शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे आव्हान स्वीकारावे."

उद्‌घाटनप्रसंगी वसगडेच्या सरपंच योगिता बागडी, शोभा राजमाने, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. संपदा ठिपकुर्ले, एम. आर. माने, प्रा. जी. के. सोनटक्के, ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एस. नाकाडी यांनी आभार मानले.

पुढारी

बुधवार, २२ जानेवारी २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांनी विवेकवादी तत्त्वे जोपासली

## डॉ. अच्युत गोडबोले; स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत ज्ञानशिदोरी दिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आयुष्यभर विवेकवादी तत्त्वे जोपासली. त्यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असून त्याच विचारांचा वसा व वारसा गेली ४० वर्षे समर्थपणे सांभाळला जात असल्याचे प्रतिपादन डॉ. अच्युत गोडबोले यांनी केले.

विवेकानंद कॉलेजने आयोजित 'ज्ञानशिदोरी दिन' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

डॉ. गोडबोले म्हणाले, अनेक क्षेत्रात लेखन केले असले तरी मी कोणत्याही विषयातील तज्ज्ञ आहे असे मानत नाही. विज्ञान तंत्रज्ञानापेक्षा संगीतादी कलाही महत्त्वाच्या आहेत.

प्राचार्य साळुंखे म्हणाले, वाचन संस्कृती वाढावी यासाठी ज्ञानशिदोरी हा उपक्रम स्तुत्य आहे. डॉ. साळुंखे यांनी माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हा विचार सर्वदूर पसरवला आहे. प्राचार्या शैलजा साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे (सहसचिव अर्थ), प्राचार्य सिताराम गवळी (सहसचिव प्रशासन), श्रीराम साळुंखे, कोल्हापूर विभागप्रमुख बी. बी. अपराध, आर. के. भोसले, प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य धनराज भोसले, रजिस्ट्रार आर. बी. जोग उपस्थित होते.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजने आयोजित ज्ञानशिदोरी दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना लेखक डॉ. अच्युत गोडबोले. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी. (छाया : पप्पू अत्तार)**